महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती – ४४४ ६०२

पत्र क्र. अविमं/भांडार/ ४१
दिनांक: ११.०७.२०२२

प्रति,

........................................
........................................

विषय :– माध्यमिक परिक्षा, माध्यमिक गोपनीय, लेखा 'ब' व उच्च माध्यमिक गोपनिय शाखेत स्लॅबमधून पाणी गळती होत असलेले ठिकाण दुरूस्ती करण्याकरीता दरपत्रक सादर करण्याबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, अमरावती विभागीय शिक्षण मंडळाची इमारत तीन माळयाची असून सर्वात वरच्या तिस–या मजल्यावर अधिकारी/कर्मचारी/अभ्यांगतांसाठी तात्पुरत्या स्वरूपात राहण्यासाठी पाच अतिथीगृह (रेस्टहाउस) आहेत. सदर पाच अतिथीगृहाशिवाय एक जनरल हॉल आहे. सदर जनरल हॉलचे प्रसाधनगृह वेगळे असून त्यामधून किंवा पाच प्रसाधनगृहातील टाईल्स /फरशी मधून किंवा त्या खालील अंडरग्राउंड पाईपलाईन फुटून त्यामधून दुस–या माळयावरील माध्यमिक परीक्षा, माध्यमिक गोपनीय विभाग, लेखा 'ब', उच्च माध्यमिक गोपनिय व भांडार शाखेसमोरील स्लॅबमधून पाणी गळती होत आहे.

कार्यालय इमरतीतील सदर गळती रोखण्यकरीता व डागडुगी करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. **दरपत्रके सादर करण्यापुर्वी प्रत्यक्ष कामाची पाहणी करावी व नंतरच दरपत्रके सादर करावी.**याकरीता या कार्यालयास दि. २१/०७/२०२२ पर्यन्त कार्यालयीन वेळेत विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, टोपेनगर, अमरावती येथे पाकीटावर विषय लिहून बंद पाकिटात दरपत्रक सादर करावीत.

(signature) 11/7/2022

विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती



Scanned by CamScanner

## अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील :-

१) कार्यालयाच्या स्लॅब मधून होणारी गळती शोधून ती पुर्णपणे रोखण्यकरीता व डागडुगी करण्यासाठी आपणांस हमीपत्र सादर करावे लागेल, गळती दुरुस्ती करीता वापरावयाचे सिमेंट,लोखंड,गळती रोधक सोल्युशन इत्यादी साहित्य उच्च प्रतीचे व नामांकित कंपनीचे घेऊन ते प्रमाणकानुसार साहित्य वापरणे आवश्यक राहील.

२) गळती दुरूस्ती नंतर करण्यात येणारी रंगरंगोटी/ कलर हे सुध्दा नामांकित कंपनीचे असावेत.

३) गळती दुरूती करीता लागणारे साहित्य ते ने-आण करण्याची /वाहतूकीची जबाबदारी /लेबर वर्क इत्यादी खर्च सदर कामामध्ये अंतर्भूत राहील.

४) आपण दरपत्रकात दर्शविलेले दर हे सर्व करासहीत त्यामध्ये समावेश करावा.

५) सदर काम कार्यादेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत काम सुरु करावे लागेल आणि कामसुरु झाल्यापासून १ महिण्याच्या आत पूर्ण करावे.

६) काम पूर्ण झाल्यानंतर देयक दोन प्रतीत सादर करावे.

७) तसेच देयकामधून नियमानुसार २% आयकर व २% जी.एस.टी.चा टी.डी.एस. कपात करण्यात येईल. देयकासोबत पॅनकार्डची झेरॉक्सप्रत जोडणे आवश्यक राहील.

**८) दरपत्रक धारकाणे प्रथम दरपत्रके सादर करण्यापुर्वी मंडळ कार्यालयातील करावयाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी क्तावी पाहणी केल्यानंतर या करीता पाहणी केल्याबाबत भांडार शाखेने नोंदवही ठेवण्यात आलेली आहे, त्यामध्ये नोंद करून स्वक्षरी क्तावी त्या नंतरच दरपत्रके सादर करावी.**

९) या संबंधात काही कायदेशीर प्रकरण उद्‌भवल्यास ते अमरावती येथील मा.न्यायालयाच्या कक्षेत राहील.

१०) सदर कराराचे व कामा संदर्भात शासनाचे अन्य/अनुषंगीक कर असल्यास तो भरण्याची जबाबदारी आपली (दरपत्रकधारकाची) राहील.

११) कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार सक्षम समितीने राखून ठेवले आहेत.

१२) आपणास कार्यदेश दिल्यानंतर आपण काम न स्विकारल्यास आपली सुरक्षा ठेव जप्त करणे वा इतर दंडात्मक कारवाई करण्यासंबंधी मंडळाचे सक्षम समितीचा निर्णय आपणावर बंधनकारक राहील.

१३) दरपत्रकात कोणतीही अट टाकू नये. अन्यथा आपले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१४) दर मान्य झाल्यास रू.५००/-च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करून सोबत रू.१०,०००/- (दहा हजार रूपये फक्त) रकमेचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा ( सुरक्षा ठेवीचा) धनाकर्ष/डी.डी. करारपत्रासोबत जोडावा लागेल

१५) सदर कामाकरीता आपणांकडून नेमलेल्या व्यक्तीवर सोपविलेली कामे योग्यरितीने व मंडळाच्या अपेक्षेप्रमाणे पार पाडले जातात या बाबत पाहण्याची जबाबदरी आपली राहील. कामाच्या वेळेस संबंधित व्यक्तीकडून मंडळाच्या संपत्तीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपणास करावी लागेल अथवा एखाद्या व्यक्तीस ईजा, दुखापत, अपघातामुळे अपंगत्व वा मुत्यू झाल्यास त्याची जबाबदारी आपली राहील,यांची नोंद घ्यावी.

१६) उपरोक्त अटी पैकी एखादी अट शिथील अथवा नव्याने वाढ करण्याचा अधिकार मंडळाचा असेल.

१७) दरपत्रकाचे बंद पाकीट दि. /०७/२०२२ पर्यन्त मंडळांत दुपारी ४:०० वाजेपर्यत न चूकता जमा करावीत.

१८) आपणाकडे शासनाने दिलेला बांधकामाचा परवाना असने अनिवार्य असुन दरपत्रकासोबत त्याची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

(स्वाक्षरी) 11/7/2022

विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

Scanned by CamScanner